# आनंदलहरी

## श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने

### भाग – २

# आनंदलहरी

श्री दत्तमहाराज कवीश्वर

यांची

प्रवचने

भाग – २

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
त्रिपुरी पौर्णिमा, शके १९२९
शनिवार, दि. २४ नोव्हेंबर, २००७

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प.पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५

*एकंनित्यं विमलमचलं सर्वधिसाक्षीभूतं ।*
*भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥*

*सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।*
*शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमास्तुते ॥*

*ईश्वरोगुरुरात्मेति मूर्तिभेदा विभागिने ।*
*व्योपवत् व्याप्तदेहाय दक्षिणा मूर्तये नम: ॥*

भगवान् श्री शंकराचार्य महाराजांनी दक्षिणा मूर्ती स्तोत्राच्या शेवटी असा क्रम दाखिवलेला आहे.

***ईश्वर: गुरू: आणि आत्मा.***

ईश्वराची उपासना ही आरंभी सांगितलेली आहे. भारतवर्षामध्ये आठव्या वर्षी उपनयन झाल्याबरोबर हा महामंत्र त्या बटूला दिला जातो. ईश्वर शक्ती काय आहे याची कल्पना त्या वयातच त्याला मंत्रदीक्षा देऊन दिली जाते. पुढं पूर्व संस्कारांप्रमाणे जशी जशी ईश्वरोपासना होत जाईल, ईश्वर कृपा झाल्यानंतर ''शाब्दे परेच निष्णातम्'' अशा प्रकारचे ब्रह्मज्ञानी सद्गुरु आणखी भेटतात.

पांडुरंगांनीच नामदेवाला सद्गुरुंची गांठ घालून दिली, पूर्ण होण्याकरता. कच्चा म्हटला त्याला सगळ्या संतांनी. मनाला वाईट वाटलं. पक्कं होण्याकरता तुला सद्गुरुंच्याकडे जायला पाहिजे. ईश्वर कृपेनं अशा आणखी ब्रह्मज्ञानी सद्गुरुंची भेट होती. आणि त्यांची कृपा झाल्यानंतर सर्वव्यापी ज्याला परब्रह्म म्हणतात, भगवान

म्हणतात, परमात्मा म्हणतात त्या आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होऊन सर्व दु:ख निवृत्ती, सर्व काम निवृत्ती, ज्याला मोक्ष म्हणतात, त्या मोक्षाची प्राप्ती होती. जन्म मरण हे संपून जातं.

भारतवर्षाचं हे मोठं भाग्य आहे की अशा प्रकारचे संत महात्मे हे केवळ भूतकालीन आहेत असं कांही म्हणता येणार नाही. सध्या धर्माधर्माचा विचार करणारे बुद्धीवादी धर्म हा कालबाह्य झालेला आहे, राज्य शासनही धर्मातीत आहे अशीच कल्पना त्यांनी पुढं मांडलेली आहे.

तसं सत्पुरुषांच्या बाबतीत म्हणता येत नाही. संतांचा जो कांही आदेश आहे, उपदेश आहे तो सर्वही जीवांचं अज्ञान, मोह, भ्रांती, ही दूर करून त्यांना आत्मस्वरूपाची जाणीव करून देण्याकरता आहे. याकरता त्यांचा उपदेश असतो.

***'आधी केले आणि मग सांगितले'***

अशी त्यांची उपदेशाची पद्धती असती. अगोदर सर्वही साधनाभ्यास पूर्ण केला. साधकदशा अनेक जन्म आणखी केली, अभ्यास केला आणि नंतर सिद्धावस्था प्राप्त झाली. सिद्धावस्थेपेक्षा साधकदशा ही महत्त्वाची आहे. साधकाचीच तयारी फार व्हावी लागती. त्याकरता ही ईश्वराची उपासना, भक्तीमार्ग ज्याला म्हणतात. सर्व साधुसंतांनी आणखी त्याचा प्रसार केलेला आहे. उपदेश त्याचा केलेला आहे.

***'कलौ चंडि विनायकौ'***

या वचनाप्रमाणे कलियुगामध्ये आणखी भगवतीची,

आदिशक्तीची उपासना, ही विशेष फलदायक म्हणून सांगितलेली आहे. करतही आहेत. आचार्य महाराजांनी सर्वही आणखी उपासकांना उद्देशून पंचायतन पूजेचा आदेश दिलेला आहे. मुख्य कोणची इष्ट देवता असेल त्याला अनुसरून पंचायतनाची योजना म्हणजे पांचही देवता ईश्वर स्वरूप, त्यांची उपासना आणखी सर्वत्र आचार्यांच्या आदेशामुळे चालू आहे. त्यातही प्रत्यक्ष शक्तीची उपासना ही भारतवर्षामध्ये पुष्कळ ठिकाणी चालू आहे. प्रत्यक्ष शंकराचार्यांची पीठ चारही दिशांना आहेत, त्या सर्वही पीठांमधून शक्तीची उपासना अखंड चालू आहे.

शारदा, चंद्रमौलिश्वर सर्व विद्यांचा ईशान भगवान् शंकर परमात्मा त्याची उपासना आहेच आहे. पण शारदाम्बा, भगवती शक्ती देवी, ह्या शक्तीदेवीचीही उपासना त्यांच्या पीठांमधून चालू आहे. कालीशक्तीची उपासना करणारे मोठे मोठे संत महात्मेसुद्धा ''विठाबाई, कृष्णाबाई'' अशा रूपांनीच आपल्या उपास्य देवतेचं आवाहन करतात, म्हणजे मातृ रूपानीच त्या देवतेकडे पहातात. अशीही उपासना पद्धती आहे. या प्रमाणे ही उपासना पद्धती सांगणारे महात्मेही आज आहेत.

हे स्थान ज्यांच्या संकल्पाने निर्माण झालं त्या संकल्पामध्ये सगळी ही पुढची अनुष्ठानं, काय काय पुढं होत राहाणार हाही संकल्प असला पाहिजे. सर्व संकल्प संन्यासी असतात. कोणचाही संकल्प नाही. शुभही वासना नाहीत आणि अशुभही वासना नाहीयेत. परंतु

ईश्वराची कृपा, ईश्वराचा आदेश म्हणा किंवा ईश्वराचच कार्य जे आहे. त्रिगुणात्मक विश्व आहे. त्रिगुणात्मक विश्वामध्ये राजस आणि तामसच कार्य सारखी चालू राहातील असं नाही. त्याच्याबरोबर सात्विक कार्यही असणार. सत्वगुणाचही कार्य चालू राहणार. आणि त्या दृष्टीनं, आपल्या संकल्प शक्तीनं सर्वही लोकांच्या मनामध्ये तशी सद्भावना, सद्बुद्धी, सन्मती निर्माण करून आणि त्यांच्या द्वारानी अशा प्रकारची मोठी मोठी पुण्य कार्य ही त्यांच्या संकल्पाने होत असणार.

ज्ञानेश्वर महाराजांनी संपूर्ण ज्ञानेश्वरी लिहून शेवटी जे पसायदान मागितलेले आहे आपल्या सद्गुरुंच्या जवळ, त्यात हेच आहे. ईश्वराची उपासना अखंड चालू राहावी. हेच त्यांचं शेवटी मागणं आहे.

तेव्हां आज या ठिकाणी हे मोठं जे पुण्यकर्म चालू आहे लक्षचंडीरूप अनुष्ठान त्या - अनुष्ठानाचे एक महत्व म्हणजे असं शास्त्रानी सांगितलेल्या अनुष्ठानांचं अगोदर ज्ञान असायला पाहिजे. कर्मानुष्ठान करताना

***'विद्यया करोति'***

ज्ञानपूर्वक जो आणखी अनुष्ठान करतो त्याला जास्ती फळ मिळतं, असं उपनिषदामध्ये सांगितले आहे. सर्वच मंडळी तशी ज्ञानी असणं कठीण आहे. परंतु उपनयन झाल्यानंतर ज्यांनी सांग वेदांचा अभ्यास केलेला आहे अशी मंडळी भारतवर्षामध्ये, थोडी कां होईना, अल्प प्रमाणात कां होईना, सांपडतात अद्याप. आणि त्यांनी शास्त्राचा अभ्यास केला असल्यामुळे कोणचं प्रधानकर्म आहे, कोणचं अंग

कर्म आहे, त्याचा एकंदर काल कोणचा आहे, एकंदर विधी काय आहे हे सर्व समजून घेऊन आणि त्याप्रमाणे अशी मंडळी मिळून त्यांच्या द्वारानी करणं हे एक वैशिष्ट्य आहे. हेही महात्म्यांच्या संकल्पामध्ये सगळं असलं पाहिजे ना !

***'यथा सांग ते कर्म कांही घडे ना'***

समर्थ म्हणतात. पण अशा प्रकारची विधिज्ञ मंडळी अल्प आहेत असा त्याचा अर्थ आहे. कोणचच कर्म घडत नाही असं कसं म्हणता येईल? अल्प ठिकाणी होणार. म्हणून अशी विधी जाणणारी मंडळीही आपल्यामध्ये आहेत. आणि यथा विधी कर्म चालू आहेत. तेव्हां जगन्मातेच्या जवळ आपल्याला कांही तरी प्रार्थना करायला पाहिजे आहे. ती प्रार्थना आज या ठिकाणी करायची आहे.

मध्यम चरित्रात चौथ्या अध्यायामध्ये सर्व इंद्रादिक देव निराश झाले होते, महिषासुराने सबंध स्वर्गाचं राज्य ताब्यामध्ये घेतल्यामुळे. तपश्चर्या करून तर मिळवून आणखी त्यांनी देवांचे राज्य घेतले. आणि वर तरी असा विलक्षण मागितला की कोणच्याही पुरूषापासून माझा नाश होऊ नये. बायका कोण मारणार मला? अशा अभिमानांत तो गेला. पुरूषांमध्ये म्हणजे सगळे आले; देव आले, मानव आले.

रामावताराच्या वेळेला रावण हा मनुष्यापासून मरण नको असे मागायला विसरला म्हणा किंवा अहंकारामुळे मनुष्य मला कांही करू शकणार नाही अशा अहंकारामध्ये गेला. इथं त्याने कोणच्याही पुरूषापासून वध नाही, असा वर मागितला. त्या वेळेला आणखी हा

महिषासूर मर्दिनीचा अवतार झाला. त्यात त्याचा नाश झाला. त्याचे सगळे मोठे मोठे सेनापती, अनुयायी नष्ट झाले. शेवटी त्या देवांनीच प्रार्थना केलेली आहे. त्यात एक महत्त्वाचा श्लोक आहे.

***या श्री: स्वयं सुकृतिनां***

***भवनेषु अलक्ष्मी:***

***पापात्मनां कृतधियां हृदयेषु बुद्धि:***

***श्रद्धा सतां कुलजन: प्रभवस्य लज्जा***

***तान् त्वाम् नतास्म परिपालय देवि विश्वम्***

सर्व देवगण स्तुती करताहेत. आणि मागताहेत, देवीजवळ, जगदंबेजवळ ''या पांच रूपांनी आपण आमच्या इथे वास्तव्य करावं आणखी सगळ्या जगाचं पालन करावं.'' सर्व जगाचं संरक्षण करणारी ही पांच रूपं आहेत, असं या श्लोकात त्यांनी दाखिवलेलं आहे. सौम्य रूपं आहेत. सौम्य रूपं आणि घोर रूपं. दोन्ही रूपं आहेत जगदंबेची.

***'घोरा तनु अघोरा तनु'***

अशी प्रार्थना आहेच आहे. ती दोन्ही परमेश्वराची दाखिवलेली आहेत. तर ही जी रूपं आहेत या रूपांनी आपण ह्या जगामध्ये निरंतर राहावं आणि संपूर्ण जगाचं परिपालन करावं अशी प्रार्थना देव करताहेत.

***'या श्री: स्वयं सुकृतिनां भवनेष्वलक्ष्मी:'***

पहिलं रूप त्यांनी सांगितलं. श्री म्हणजे संपत्ती. असा एक अर्थ प्रसिद्ध आहे. तोही घ्यायला हरकत नाही. सुकृती म्हणजे

पुण्यकर्म करणारी मंडळी जी आहेत त्यांच्याकडे संपत्ती नेहमी असावी. संपत्तीच्या रूपानी, लक्ष्मीच्या रूपानी आपला निवास आणखी तिथे नेहमी पाहिजे. धर्माचरण जे व्हायचं त्याला वित्त हे कारण आहे ना ! वित्तामध्ये मानुष वित्त निराळं, दैव वित्त निराळं, हा विभाग केलेला आहे शास्त्रकारांनी. परंतु मानुष वित्त ज्याला म्हणतात ती सबंधही एकंदरीत अंग आहे ना ! अन्वाधानादि अगदी ब्राह्मण भोजन पर्यंत, अन्नदानही त्यात येतं ना ! त्याला आणखी श्रीची जरूरी आहे. त्याकरता श्रीरूपाने आपला निवास श्रेष्ठ पुण्यशील महात्मे जे आहेत त्यांच्या घरामध्ये असावा. हाही एक अर्थ आहे.

दुसरा '**श्री**' शब्दाचा अर्थ.

सज्जनांची श्री आहे. दैवी संपत्ती ज्याला म्हणतात. संपूर्ण ज्ञान जे आहे, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, सर्व स्मृती, सर्व पुराणं, ह्या रूपानी सर्व जे ज्ञान आहे हीसुद्धा एक श्री मानलेली आहे, शास्त्रकारांनी.

**'सताम्'**

जे श्रेष्ठ महात्मे आहेत, त्यांच्यासमोर ही श्री पाहिजे. सर्व ज्ञान आम्हाला मिळालं पाहिजे. या रूपानेही निवास पाहिजे नां ! शब्दब्रह्म आणि परब्रह्म. दोन विभाग आहेत, भगवतीचे. तर ही भगवती शब्दात्मकही आहे. सर्व शब्दस्वरूप ती आहे. तेव्हां या 'श्री' रूपानी आपला निवास भूमीवर असला म्हणजे मनामध्ये येणाऱ्या ज्या कांही दुर्वासना आहेत, त्या विचारांनी, ज्ञानाच्या प्रभावानी दूर होतील

आणखी शांती प्राप्त होण्याचा संभव आहे. ही पहिली मागणी आहे.

आणि दुसरी मागणी.

***'अलक्ष्मीः पापात्मनां भवनेषु'***

म्हणताहेत देव. पापात्मे जे आहेत, त्यांच्या घरामध्ये अलक्ष्मी रूपाने आपण राहा. म्हणजे ते नेहमी दरिद्री असावेत, असं देवांनी म्हणणं बरं नाही. सात्विक श्रेष्ठ देव आहेत. पापी माणसानी दरिद्री राहावं असं म्हणायची जरूरी काय? तर त्याचा अभिप्राय असा आहे- पापी माणसाला त्याच्या कर्माचं फल तत्काल मिळावं. ते लवकर मिळत नाही.

कर्माचं फल हे निश्चित ठरलेलं आहे. सृष्टी ज्या वेळी निर्माण केली जगदंबेनं, भगवंतांनी त्याचबरोबर कर्मांनी सृष्टी झाली आणि सृष्टीचं संरक्षण विलय वगैरे पुढची सगळी कार्य कर्मावर आधारीत आहेत. तर जी जी कर्म केली असतील - पापकर्म असो किंवा पुण्यकर्म त्याचं फल निश्चित आहे. काल कदाचित कमी जास्ती होत असेल.

***यदिनात्मनी पुत्रेषु नचेत पुत्रेषु नत्रुचू ।***
***नत्रेक्त कुतो धर्मः अकर्तु भवति निष्फलः ॥***

धर्मः, अधर्मः दोन्हींचे फल आहे. केलेलं जे कर्म आहे ते फलदायक आहे हा शास्त्र सिद्धांत आहे. तो शास्त्रकारांनी, ऋषीमुनींनी मांडला, सर्व संत महात्म्यांनी आणखी त्याचच अनुसरण केलेलं आहे. शास्त्रीय सिद्धांत आहे तो. कर्मानुसार आणखी सुख दुःखाची प्राप्ती होते. हा

सिद्धांत एकदा मान्य झाल्यानंतर ईश्वराची सिद्धी होण्यास कांही वेळ नाहीये. सत्कर्मांनी पुण्य कर्मांनी सुख प्राप्त होतं. हा सिद्धांत आणखी जेमिनी महर्षींनी मांडलेला आहे. ते मीमांसक होते. पण व्यास महर्षी आणखी थोडसं पुढं गेले. कर्म म्हणजे क्रिया आहे. शरीरानी, वाणीनं, मनानी होणाऱ्या ज्या क्रिया आहेत, त्या क्रियेने कसे फळ मिळेल? क्रिया जड आहे ना ! क्रियेला कांही समजत नाही ना ! अमूक मनुष्य ऑफिसमध्ये अगदी वेळच्या वेळेला येतो. काम बरोबर करतो. कधीही रजा वगैरे घेत नाही. ही त्याची क्रिया झाली. पण ती क्रिया कारण आहे, कर्म कारण आहे. पण क्रिया जाणणारा कोणी तरी चेतन पाहिजे, वरचा अधिकारी की हा मनुष्य बरोबर काम करणारा आहे. त्याच्या बुद्धीमध्ये ते आल्याबरोबर शिफारस केल्याबरोबर ह्याला प्रमोशन मिळतं लगेचं कर्म जरी कारण असलं तरी केवल कर्मवाद हा वैदिक संस्कृतीमध्ये नाही. सर्व कर्मांना जाणणारी अशी एक शक्ती आहे, ईश्वर शक्ती. कर्म करण्याला प्रवृत्त करणारी, बुद्धीला प्रेरणा करणारीही अशी एक ईश्वर शक्ती आहे. आणि त्या ईश्वराची, त्या बटूला आठव्या वर्षी उपनयन संस्कार झाल्याबरोबर ती मंत्र दीक्षा देऊन ही प्रार्थना करायला सांगितली आहे. कोणच्याही देशामध्ये आठव्या वर्षी ईश्वराची कल्पना दिली जात नाही. फक्त भारतामध्ये आहे.

***'अलक्ष्मीः'*** हे एक मागितलं त्यांनी. आणखी

***'कृतधियां हृदयेषु बुद्धिः'***

हे महत्वाचं मागणं आहे. संपत्ती मिळाली पुष्कळ. पुण्यकर्मही

होताहेत. परंतु आपल्याजवळ संपत्ती असेल तर त्या संपत्तीचा विनियोग करण्याची बुद्धी पाहिजे. आपली संपत्ती ही केवळ साधन आहे. संपत्ती साध्य नाहीये. धन हे साधन आहे. त्या धनाचा उपयोग हा सत्कर्माकरता झाला पाहिजे, ईश्वर प्रीतीकरता झाला पाहिजे. अशा प्रकारची जी बुद्धी आहे तेही एक भगवतीचं स्वरूप आपल्या राष्ट्रात असावं अशी देवांची प्रार्थना आहे. बुद्धीरूप-सत्कर्म करण्याची बुद्धी, संस्कृत बुद्धी

*'कृतधियां म्हणजे संस्कृतधियां'*

जन्माला आल्यापासून शेवटपर्यंत आपल्या बुद्धीवर चांगले संस्कार करण्याचा प्रयत्न करणारी मोठी मोठी मंडळी आहेत. धर्मराजाचे उदाहरण आहेच आहे. धर्मराज नेहमी आपली बुद्धी शास्त्राप्रमाणे वागती की नाही हे पहात होते. शास्त्राप्रमाणे वागायचं. वनवास भोगावा लागला. द्रौपदीचा आणि धर्मराजाचा प्रसंगाने मतभेद होत असे. द्रौपदीनं वारंवार अशा प्रकारची गोष्ट धर्मराजांच्या पुढं मांडावी. ''तुमच्या या वर्तनामुळे किंवा तुमच्या एकंदर या क्लेशामुळे धर्माचं फळ मिळतं किंवा नाही असा मला संशय येतोय. धर्माचं फळ देणारा ईश्वर आहे किंवा नाही असाही संशय मला यायला लागलाय. अधर्माने वागणारे सम्राट राजे होतात. आणि धर्माने वागणारे तुम्ही वनवास भोगता. कां संशय येऊ नये?''

त्याला उत्तर धर्मराजांनी दिलेलं आहे. ''बाई, धर्माचं फळ मिळण्याकरता मी धर्माचं आचरण करीतच नाही. कांही तरी मला

धर्माचं फळ देवानी द्यावं म्हणून मी धर्माचरण करीत नाही. धर्माचरण करावं अशी त्याची आज्ञा आहे. जन्माला त्यानं घातलेलं आहे. मनुष्य देह दिलेला आहे. इंद्रिये दिलेली आहेत. उत्तम प्रकारची बुद्धी, मन दिलेलं आहे. त्यानी चांगली कर्म करणं ही ही त्याची आज्ञा पालन आहे. फल देणं वगैरे याचा आम्ही विचार करायचा नाही. कांही तरी फलाकरता पुण्यकर्म करणारा जो आहे तो धर्माचा वाणिज्य करणारा आहे. व्यापारी आहे तो. मी इतका धर्म केला, मी तितकं दान केलं. मला इतकं फळ मिळालं पाहिजे. असं म्हणणारा तो धर्माचा व्यापार करणारा आहे. तो श्रेष्ठ धर्मशील होऊ शकत नाहीये.''

देव आणि दैत्य हा जो भेद झाला याचं कारण हेच आहे. असुरांनीसुद्धा तपश्चर्या केलेली आहे. असुरांनी मान्य केलं, आत्मा हाही अनंत आहे. कालही अनंत आहे. मग मला स्वर्गाचं राज्य कां मिळिवता येणार नाही? प्रयोग म्हणून का होईना उपासना त्याने केली, ईश्वर प्रसन्न झाल्यानंतर वरप्रदान मिळालं. आणि मग त्यांची बुद्धी बदलली. आम्हाला काय देवांनी हे वर फुकट दिले काय? आम्ही तपश्चर्या केली म्हणून फळ दिलं. म्हणजे स्वतःचा अहंकार किंवा स्वतःचं कर्म त्यांच्या मनामध्ये कायम राहिलेलं आहे. ईश्वरानी फळ दिलं ईश्वराबद्दल कृतज्ञता राहिली नाही. म्हणून ते दैत्य ठरले. प्रल्हादजी भक्त ठरले. त्यांचा पिता हा मात्र असुर ठरलेला आहे.

तर ***'सुकृतिनां हृदयेषु बुद्धिः'***

अत्यंत संस्कृत ज्यांची बुद्धी आहे, आपल्या बुद्धीकडं ज्यांचं

लक्ष आहे. मनुष्य जन्म असेपर्यंत बुद्धी चांगली करण्याकरता सारखा प्रयत्न केला पाहिजे. सत्कर्माचरण हे बुद्धीवरती संस्कार आहेत. हा पांचभौतिक देह जाणारा आहे. पण गेल्यानंतर दुसऱ्या शरीरामध्ये इंद्रिय, बुद्धी, मन वगैरे सगळं बरोबर घेऊन जातो तो जीवात्मा. म्हणजे बुद्धी बरोबर येणारी आहे.

*'पूर्व प्रज्ञा च'*

सांगताहेत. बरोबर आहे. तेव्हां पूर्वीची आपण संस्कृत चांगली बुद्धी आपण जर बरोबर घेऊन गेलो तर पुढही तसाच अभ्यास चालू राहातो. भगवंतांनी अर्जुनाला ते आश्वासन दिलेले आहे.

तर अशा प्रकारची बुद्धी. बुद्धीवाद हा ऋषी मुनींना, आचार्यांना मान्य नाही, संत महात्म्यांना मान्य नाही अशी समजून कोणीही करून घेऊन उपयोगी नाही. बुद्धीनच सगळी कामं होणार ना ! प्रपंच करायलाही बुद्धी लागणार. चांगली वाईट ही गोष्ट निराळी. परंतु बुद्धी शिवाय प्रपंच होणार नाही. परमार्थसुद्धा बुद्धीशिवाय होणार नाही. वैराग्य पाहिजे, त्याग पाहिजे, विनय पाहिजे. अनेक प्रकारचे बुद्धीचे गुण आहेत. दैवी संपत्ती. परंतु ती बुद्धी संस्कृत पाहिजे. एवढा आग्रह आहे. संस्कार त्या बुद्धीवर झाले पाहिजेत. संस्कार शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी ''बुद्धीमध्ये असलेले दोष सगळे काढून टाकले पाहिजेत. आणि बुद्धीमध्ये गुणांचे संक्रमण केलं गेलं पाहिजे.'' त्याकरता प्रयत्न केला पाहिजे म्हणून मनुष्य जन्माशिवाय दुसऱ्या कोणत्याही जन्मात हा प्रयत्न होणार नाही. देवसुद्धा करू शकत

नाहीत. इतकी त्यांना अनुकूलता मिळालेली आहे त्यांच्या पूर्वीच्या पुण्यकर्माने की त्यांना इकडे लक्ष द्यायला सवडच नाही. यज्ञयाग करावा वगैरे कांही वाटत नाही. केवळ आपल्या विषय सुखामध्ये दंग असलेले देव कशाला इथं विचार करताहेत ! क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार सांगितलाय भगवंतांनी. तेराव्या अध्यायामध्ये. विचार करायला, चिंतन करायला त्यांना सवडच नाहीये.

तेव्हां मनामध्ये, बुद्धीत कोणचे दोष आहेत हे आपल्या बुद्धीने जाणून ते दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हा संस्कार आहे. आरसा स्वच्छ पुसला पाहिजे ना ! मग त्याच्यामध्ये प्रतिबिंब चांगलं स्वच्छ दिसेल. दोष दूर करणं, योगशास्त्रात आरंभाला आणखी दोष निवृत्ती हेच सांगितलं आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह, ब्रह्मचर्य हे जे पांच यम म्हणून सांगितलेले आहेत. त्यांनी साधन पहिलं, म्हणजे दोष निवृत्ती.

सत्य बोलावं हा आग्रह नाही. पण असत्य बोलू नये. वाणीनं सत्यही बोललं जाईल असत्यही बोललं जाईल. पण वाणीवर नियंत्रण करायचं म्हणजे असत्य बोलायचं नाही. हिंसा करू नये. अहिंसा याचा अर्थ कोणालाही पीडा द्यायची नाही. शरीरानी, वाणीनं, मनानी ज्या कांही हिंसा आपल्याकडून होतील ती पीडा न होण्याकडे लक्ष देणं अशी सगळी दोष निवृत्ती रूपं आहेत.

आधी दोष घालवायचे मग गुणाधान करायचे. म्हणजे बुद्धीवाद हा असा पाहिजे, की ज्या बुद्धीमध्ये कोणचेही दोष राहिलेले नाहीत.

आणखी अत्यंत गुण संपत्ती आहेत. ईश्वर प्रेम आहे, त्याग आहे. ह्या सगळ्या गुणांना दैवी संपत्ती म्हणून भगवान म्हणतात. हे सगळे गुण आहेत. तर हे गुण आपल्या बुद्धीमध्ये मिळवण्याकरता प्रयत्न केला पाहिजे. असा संस्कृत बुद्धीवाद प्राचीन भारतवर्षामध्ये ऋषी, संत महात्मे यांना अभिप्रेत आहे. आणि त्या बुद्धीनेच सर्व कार्य होतय.

***'कृतधियां हृदयेषु बुद्धिः'***

संस्कृत बुद्धी जर राष्ट्रात असेल तर राष्ट्राचे कल्याण आहे.

***'श्रद्धा सताम्'***

हे पुढचं लक्षण सांगताहेत. श्रद्धा एक पाहिजे. बुद्धीचें अनेक गुण आहेत. पण श्रद्धेला स्वतंत्र त्यांनी स्थान दिलेलं आहे.

***'श्रद्धावान् लभते ज्ञानं'***

भगवान् गीतेमध्ये अर्जुनाला सांगताहेत. आरंभाला सांगितलं त्यांनी.

***तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।***
***उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥***

आत्मज्ञान त्याचा उपदेश करतील म्हणाले महात्मे. कोणची साधनं? प्रणिपात पाहिल्याबरोबर महात्म्यांना अगदी साष्टांग दंडवत् घालायचा. भगवंताची मूर्ती जरी पाहिली तरी नमस्कार घातला पाहिजे. प्रत्यक्ष बोलणारा चालणारा महात्मा भेटला तर घालायलाच पाहिजे. पण मूर्ती हा सुद्धा एक अवतार मानलेला आहे भक्ती शास्त्रामध्ये. प्रतिमा हा एक अवतार आहे ईश्वराचा. अर्थात त्या मूर्तीला

पाहूनही वंदन केलं पाहिजे. तर प्रणिपात हा एक पहिला उपाय सांगितला त्यांनी. अगदी गेल्याबरोबर गुरूजींना नमस्कार केला गुरूजी प्रसन्न झाले. काय, बाबा, तुला शिकायचयं, राहा, म्हणाले. हा एक मार्ग.

***'परिप्रश्नेन'***

दुसरा एक. चिकित्सा ज्याला आपण म्हणतो. हे योग्य नाही मला पटत नाही. सांगायला हरकत नाही. सांगणारे समर्थ गुरूजी भेटल्यानंतर सांगायला काय हरकत आहे. कोणीही ऐकायला तयार नाही. काय, ईश्वर आहे किंवा नाही. कोणाला ईश्वराची कल्पनाही नाही. आणि अमूक अमूक वृद्ध मंडळींच मत आहे ईश्वर मानायला नको. लगेच वृत्त पत्रकारांनी ते छापून टाकलं. काय, कोण, वाचतय. ईश्वराची उपासना करणारे लोक कशाला ते वाचाहेत आणि तसा विचार करताहेत ! असं उपयोग नाही.

तर परिप्रश्न आवश्यक आहे. चिकित्सा. मनन व्हायला पाहिजे ना ! श्रवण, मनन आणि निदिध्यासन. त्यात मनन याचा अर्थ चिकित्सा आहे. आपल्याला चांगलं ज्ञान झालं पाहिजे अशी इच्छा धारण करून गुरु आणि शिष्य या भूमिकेवरून झालेला विचार त्याला चिकित्सा म्हणतात. परिप्रश्न करायला हरकत नाही. त्यानेही शुद्ध ज्ञान होतं.

**'सेवा'**

तिसरं साधन

काया, वाचा, मनाने सेवा. अशी एकंदर तीन जी साधनं आहेत त्या तीन साधनांनी प्रसन्न झाले महात्मे म्हणजे ते तुम्हाला उपदेश करतील, म्हणाले.

परंतु ही साधनं खरी आहेत की खोटी? हाही पुन्हा प्रश्न आहे. परीक्षा पहाण्याकरतासुद्धा दंडवत, नमस्कार घातला जातो ना ! त्याच्या मनांत खरी श्रद्धा, खरा आदर आहे की नाही माहीती नाही. प्रश्न कोणालाही विचारता येतात. त्यात काय परीक्षा पहाण्याच्या बुद्धीनं त्याला कळतय की नाही पहाण्याकरता. सेवाही परीक्षा पहाण्याकरता केली जाते. म्हणून ही ज्ञानाची तीन साधनं निश्चित नाहीत म्हणाले. ती जर ढोंगीपणाने आणि दंभाने तशा प्रकारच्या साधनांचं आचरण झालं तर ज्ञानाचा उपदेश मिळणार नाही. म्हणून पुढं जाऊन अध्यायाच्या शेवटी भगवंताने सांगितलं

*'श्रद्धावान लभते ज्ञानम्'*

श्रद्धा पाहिजे, प्रेम पाहिजे. जे आपण ऐकणार आहोत, शास्त्र ज्ञान आपल्याला मिळवायचं आहे. त्या शास्त्रावरती श्रद्धा पाहिजे.

*'नाही श्रुती जगा'*

इतका आदरभाव व्यक्त करतात ज्ञानराज. तर त्याच्याबद्दल श्रद्धा अंत:करणामध्ये पाहिजे. सांगणारे जे आहेत त्यांच्याबद्दल श्रद्धा पाहिजे. आणि अशा दृष्टीने जे ज्ञान आपण मिळिवतो ते खरं ज्ञान आपल्याला मिळू शकतं आहे.

म्हणून योगशास्त्रकारसुद्धा ज्ञान लगेच मिळत नाही म्हणतात.

कोणच्याही साधनाचं फल तत्काल मिळेल असं नाही. कोणच्याही साधनाचा अभ्यास करताना दीर्घकाल केला पाहिजे. दीर्घकाल आहे परंतु रविवारी तेवढी आम्हाला सुट्टी असती, रविवारी तेवढं आम्ही वाचू ऐकू. हे निरंतर झालं पाहिजे ना ! देवाची पूजा, देवाचे स्मरण रोज झाले पाहिजे. दीर्घकाल असलं तरी निरंतर पाहिजे. आणि तिसरं म्हणजे त्याच्याबद्दल श्रद्धा पाहिजे.

***'तया सत्कर्मी रति वाढो'***

ज्ञानेश्वर महाराज सांगताहेत. नुसतं सत्कर्म करणं याच्यापेक्षा सत्कर्म प्रेमाने आणि श्रद्धेने करणं याला महत्व आहे. तर त्याचं फल मिळतं.

तर अशा रीतीने श्रद्धा ही आवश्यक आहे. म्हणून

**'श्रद्धा सताम् कुलजन: प्रभवस्य लज्जा'**

श्रद्धा या रूपानेही आपण यावं. आणखी सत्कुळामध्ये जन्माला जे आलेले आहेत त्यांच्या बुद्धीमध्ये. आपल्या हातून अशा प्रकारचं वाईट कर्म घडतयं किंवा आपल्या मनामध्ये वाईट, अशुभ वासना आहेत, आपण अनीतीने वागतो आहोत, चांगले वागत नाही ह्याबद्दल लज्जा जर वाटत असेल, पापभीरूता जर मनामध्ये असेल, तर आणखी कांही तरी दुरितक्षय होऊ शकेल. नाही तर नाहीये. राज शासनाने पुष्कळ कायदे केले तरीसुद्धा कोणाच्याही मनामध्ये पापभीरूताच जर नाही, लोभच जास्ती जास्ती वाढायला लागल्यानंतर आणखी केवळ गुप्तहेरांच्याकडून सर्व समजणे शक्य

नाहीये. उद्या तुमच्या दुकानात नऊ वाजता तपासणी करण्याकरता येणार आहोत अशी बातमी पोलीसांच्याच कडून कळल्यानंतर काय सांपडणार आहे त्यांना? आणि त्या हेरावरच दुसरे हेर नेमायचे काय? औरंगजेब नेमत होता. एका हेरावर लक्ष ठेवायला दुसरा हेर. पण असं किती करणार?

म्हणून प्रत्येकाच्या अंत:करणामध्ये निर्लोभ वृत्ती झाली पाहिजे. पापभीरूता ज्याला म्हणतात. लज्जा वाटली पाहिजे. आपण मनुष्य जन्म घेऊन आलो. या मनुष्य जन्मामध्ये अशा प्रकारचं कर्म आपल्या हातून घडतयं. या कोर्टात जरी आपले निर्दोषत्व सिद्ध करता आलं. ते सिद्ध झाल्यावर तो निर्दोष झाला अशीच कल्पना होऊन बसल्यावर काय करायचं? तर ही लज्जाही पाहिजे. प्रत्येकाच्या मनामध्ये पापभीरूता उत्पन्न व्हावी. तर आणखी पाप थांबेल. राजशासन असमर्थ आहे. बुद्धी शुद्ध करू शकत नाहीये.

म्हणून सर्व देवांनी *'तान ताम् न तास्म परिपालय देवि विश्वम्'* अशी प्रार्थना केली. श्री रूपानी, अलक्ष्मी रूपानी, संस्कृत बुद्धी रूपानी, श्रद्धा रूपानी आणखी पापकर्माबद्दल लज्जा रूपानी ह्या सौम्य रूपांनी आपण या भूमीवरती यावं आणखी या भूलोकाचं आणि आम्हा मानवांच पालन करावं अशी प्रार्थना जगन्मातेची केलेली आहे. आणि त्या प्रार्थनेनच हे कार्य आता होणार आहे. अशी प्रार्थना आणखी सामुदायिक रीतीनं सुरू झालेली आहे. अशा या ठिकाणी होणारी मोठी मोठी अनुष्ठानं म्हणजे सामुदायिक प्रार्थनाच आहे.

जगदंबेचं स्वरूप हे सर्वांची शक्ती एकत्र होऊन तयार झालेलं आहे ना ! ह्या शक्तीच्या रूपानेच ही प्रार्थना अशी झाली. त्या प्रार्थनेनं कांही तरी बुद्धीला प्रेरणा करणारी शक्ती ही आहे

***'या देवि सर्व भूतेषु बुद्धिरूपेण संस्थित:'***

बुद्धी हे भगवतीचं स्वरूप आहे.

***'अहम् ब्रह्मास्मि'***

या शेवटच्या वृत्तीला आत्मसाक्षात्कार म्हणतात. ती बुद्धी किंवा ते स्वरूप भगवतीचं आहे. असही त्या देवांनी वर्णन केलेलं आहे. तेव्हां मानव जन्म प्राप्त झाल्यानंतर मानवाला आपल्या कर्तव्याची जाणीव होण्याकरता ही सगळी साधनं जरूर आहेत. संपत्ती पाहिजे, बुद्धी पाहिजे, श्रद्धा पाहिजे, विद्या पाहिजे, साधनं म्हणजेच साक्षात् भगवतीचं स्वरूप. आपण या रूपांनी ह्या जगामध्ये या आणखी सर्व जगाचं, देवांचं, मानवांचं संरक्षण करा अशी प्रार्थना सर्वही इंद्रादिक देवतांनी केलेली आहे.

तेव्हां अशा प्रकारचं महा अनुष्ठान या ठिकाणी चालू आहे महात्म्यांच्या संकल्पानी. विधिज्ञ अशा प्रकारची मंडळी सर्व कार्य करून घेणारी आपल्याला मिळालेली आहेत. आणखी श्रद्धा आहे, श्री आहे, संस्कृत बुद्धी आहे, भगवतीचा निवासही अशा ठिकाणी या रूपांनी आहे. तेव्हां ह्या अनुष्ठानाचं फल म्हणजे सर्वत्र चाललेलं जे दुरित आहे त्या दुरिताचा क्षय व्हावा, अशी एक प्रार्थना ज्ञानराजांनी केलेली आहे.

***'दुरितांचे तिमिर जावो'***

म्हणतात. वैयक्तिक आणि सामुदायिक दुरित सारखं चाललेलं आहे. दुरितांचा संचय होतो आहे. ते दुरित गेल्या शिवाय

***'जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात'***

स्वराज्याचा उपयोग नाही. स्वराज्य मिळालं म्हणजे आपल्या इच्छेप्रमाणे सगळं होतं. आपल्या इच्छेप्रमाणे सगळं करून घेण्याकरता स्वराज्याचा आता उपयोग करून घेतला जातो आहे. त्याच्या पूर्वीची परिस्थिती बरी होती असं म्हणायची पाळी आली.

तेव्हां या रूपानी भगवतीचा निवास सर्वत्र व्हावा. दैवी संपत्तीचा विकास सर्वत्र व्हावा. त्या रूपानी जगदंबेचा निवास सर्व ठिकाणी होऊन विश्वाचं पालन या रूपानी व्हावं अशी देवांची इच्छा आहे. हे जगदंबेचं रूप प्रगट झाल्याशिवाय परिपालन होणार नाहीये. केवळ राजशासन करू शकणार नाही. म्हणून अशा प्रकारची प्रार्थना करून अशा प्रकारची सत्कर्म निरंतर घडत राहावीत, सर्वांना आणखी अशा प्रकारची प्रेरणा व्हावी, आणखी महापुरूषांचा संकल्प हा अशा प्रकारचा फलद्रुप व्हावा एवढीच सद्‌गुरु स्वरूप जगन्मातेच्या जवळ प्रार्थना करून ही वाङ्मय सेवा पूरी करतो.

जगदंब उदयोस्तु ।

अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।

*आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम्*
*लोकाभिरामम् श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहं ।*

दिगंबर महामंत्राचा अठरा लक्ष जप झाला आणि त्याचं दशांश हवन दत्तयाग करून या ठिकाणी पार पडलेलं आहे. द्वादशाक्षरी मंत्राचे या प्रकारे जप आणि हवन करतात. मंत्रशास्त्राच्या दृष्टीनं सर्व ऋषीमंडळी ही मंत्रद्रष्टे म्हणून आहेत, मंत्रकर्ते म्हणून नाहीत. मंत्र त्यांनी पाहिला. त्यांच्या बुद्धीमध्ये प्रगट झाला आणि त्याचे नित्य अनुसंधान केल्यामुळे त्या त्या मंत्राचे ते ते ऋषी अशी प्रसिद्धी आहे. हा महामंत्र सद्‌गुरू वासुदेवानंदसरस्वती महाराजांच्या द्वारानी सगळ्यांना मिळालेला आहे. गाणगापूर, नरसोबावाडी, कारंजा अशा सर्व तीर्थक्षेत्रातून याचं जप, पठण वगैरे चालू आहे. तीन दिवस या ठिकाणी या मंत्राचं हवन झालं, हवनाच्या वेळेलाही अग्नी प्रज्वलित करावा लागतो. नियम आहे. अग्नीची ज्वाला उत्पन्न झाल्यानंतर हवन करायचं असतं. तेही या ठिकाणी पहायला मिळालं. हवन करण्याकरीता श्रद्धेनं या ठिकाणी आलेली होती.

मनुष्य जन्म मिळाल्यानंतर वेदांत, गुरू आणि ईश्वर यांचा जीवित असेपर्यंत, शेवटपर्यंत सेवा व्हावी असे मोठ-मोठ्या ऋषींचे सांगणे आहे. अध्यात्मविद्या म्हणजेच वेदांत आहे. अध्यात्मविद्येचा व्यासंग करणारी मंडळी आज या ठिकाणी सत्कारमूर्ती म्हणून उपस्थित आहेत. ग्रंथांचे चिंतन करणारी, श्रद्धेने कार्य करणारी अशा

प्रकारची मंडळी भारतामध्ये आहेत. भगवान श्रीकृष्णांनीही आणखी उल्लेख केलेला आहे. विभूती अध्यायामध्ये कांही विशिष्ट विभूती आरंभाला सांगून टाकल्या त्यांनी. पण सर्वही कालामध्ये आणखी सर्वही ठिकाणी असणाऱ्या विभूतींचा उल्लेख शेवटच्या श्लोकामध्ये त्यांनी केलेला आहे.

ज्यांच्याजवळ श्रद्धा आहे, भक्ती आहे, विरक्ती आहे, कर्तव्य परायणता आहे अशा ज्या विभूती आहेत, लोकांना मार्गदर्शन होणं ज्यांच्याकडून शक्य आहे ते माझच तेज आहे, असे सामान्य रूपांनी भगवंतांनी सांगून टाकलं. म्हणजे कालगणना किंवा तो काळ हा काळ असा विचार करण्याचंही कारण नाही.

तर अशा रीतीने अशा चांगल्या विभूतरूप सत्कारमूर्तींचा सत्कार या संस्थेतर्फे आज झाला. तोही आम्हांला पहायला मिळाला ही एक मोठी समाधानाची गोष्ट आहे.

तर अध्यात्माचे चिंतन करणं त्याचप्रमाणे गुरूची सेवा करणं आणखी ईश्वराची सेवा करणे हे एवढेच भारतामध्ये सांगून ठेवलेलं आहे. श्रुती स्मृतींचा ज्यांनी अभ्यास करून त्याप्रमाणे आपले आचरण ज्यांनी ठेवलेले आहे त्यांच्याप्रमाणे आपलं आचरण ठेवायचे हा एक मार्ग आहे.

यक्षप्रश्नांमध्ये एक प्रश्न आहे, मार्ग कोणाचा? धर्मराजांनी त्याचं उत्तर दिलं - महाजनोयेनगतस्यपंथ: । शिष्टाचार हे प्रमाण आहे. शिष्य मंडळी जी शास्त्राप्रमाणे वागणारी आहेत त्यांचं आचरण पाहूनच

आपण त्याप्रमाणे वागायचे.

***आज इतके हजारो श्लोक असणारे ऋग्वेदासारखे ग्रंथ त्यांनी केले. वाचायला कोणाला सवड आहे? आवड नाही म्हणून सवड नाही. सवड नाही असं आम्ही सांगतो, पण आवड नाही हेच खरे. जिज्ञासा ही मुख्य आहे. त्याशिवाय ज्ञान होऊ शकत नाहीये.***

तर अशा मंडळींचे आचरण आहे त्या आचरणांनी आपल्याला हे सर्व पहायला मिळतं आणि आपण कसं वागावं हे त्यावरून आपल्याला नि:संदिग्ध समजून येतं. त्याच्यामध्ये बुद्धीभेद होऊ शकत नाहीये. कारण यांची बुद्धी पूर्णपणे विकसित झालेली आहे. अपूर्णता बुद्धीमध्ये राहिलेली नाही. अशा प्रकारचे जे काही ईश्वररूप झालेले महात्मे तेही पहिल्यापासून वेदान्त, गुरू, ईश्वराची सेवा करतात. ज्ञान झाल्यानंतरही त्यांचं ते चालू रहातं, ज्ञानोत्तर भक्ती म्हणा, ज्ञानसमभक्ती म्हणा, समकालभक्ती ही त्यांची कायम चालू आहे. आणि त्या भक्तीमुळे त्या श्रद्धेमुळे आणखी सर्वांना आपोआप मार्गदर्शन होतं. तेव्हां त्यांनी जे सांगितलेलं आहे त्याप्रमाणे आणखी आचरण करण्याचा प्रयत्न करणं हेच मोठं आहे.

आणि हा समाजवाद. जो समाजवाद, समाजवाद म्हणून सध्या आणखी त्याचं प्रतिपादन केले जाते. आपल्या एकंदर भारतीय संस्कृतीमध्ये समाजवाद किती सांगितला आहे, इष्टकर्म आहे, उक्तकर्म आहे, दत्तकर्म आहे, मोठे मोठे हॉस्पिटल काढावी,

त्याचप्रमाणे बागबगीचा तयार करावा, वापी, कूप, तलाव हे सगळे तयार करावे. त्याच्यापेक्षा समाजवाद दुसरा काय होणार आहे? कोणाचाही पक्ष जरी कार्य करणार असला तरी त्याच्यापुढं हेच कर्तव्य सांगितलेलं आहे. मनुसारख्या समाजशास्त्रज्ञाने हेच सांगितले. सर्व समाजाला आणखी सुखी करण्याचा प्रयत्न करणं हा समाजवाद आणखी शास्त्रकारांनी, ऋषीमंडळींनी, आपल्या आचरणात आणून दाखविलेला आहे. आणखी ज्ञानेश्वर महाराजांच्या सारखे जे महात्मे आहेत त्यांनी हेच सांगितलेलं आहे. ज्ञानेश्वरी रचना झाल्यानंतर जे काही त्यांनी ईश्वराजवळ पसायदान मागितलेलं आहे, त्यात एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे.

***दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।***
***जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ॥***

दुरित संपलं पाहिजे. दुरित संपल्याशिवाय 'जो जे वांछिल तो ते लाहो' मिळणार नाहीये. एक व्यक्ती असो किंवा व्यक्तिसमूह असो. दुरित गेल्याशिवाय त्या समूहाने जरी इच्छा केली तरीसुद्धा घडून येत नाहीये. व्यक्तिश: कुणीतरी ती आहे, सामुहिक दुरित किती आहे आपल्यामध्ये, समाजामध्ये. सर्व विश्वामध्ये चाललेलं आहे ते कार्य. हे सगळं दुरित संपल्याशिवाय आणि स्वधर्माकडे लक्ष गेल्याशिवाय, स्वधर्माबद्दल प्रेम निर्माण झाल्याशिवाय हे होणं शक्य नाही. म्हणून ईश्वराजवळ हे मागणं मागितलं आहे. ईश्वरांनी ही कृपा करावी. सर्वांची बुद्धी शुद्ध केली पाहिजे. संतमहात्म्यांना बुद्धिविकास मान्य आहे.

भौतिक विकास पुष्कळ होईल. कर्ज काढून होईल किंवा न मागता कसं का होईना पण चालू आहे. ***केवळ भौतिक विकासापेक्षा बुद्धी विकासाला महत्त्व आहे. आणि तो बुद्धिविकास अधिकाधिक व्हावा, याकरिता ही सर्व काही आहे.***

या ठिकाणी सद्गुरू सेवा मंदीर म्हणून आणखी गुरूभक्त भगवंतरावजी यांनी आणखी कार्य सुरू ठेवलेलं आहे. ईश्वराची सेवा आहे. गुरूंची सेवा आहे. अध्यात्मचिंतन आहे त्याचप्रमाणे ईश्वराचं भजन आहे आणि अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना अन्नदान आहे, ज्ञानदान आहे. ही सगळी व्यवस्था आणखी अशा प्रकारचं आचरण जे संतांनी सांगून ठेवलेलं आहे. आणि समष्टीरूपांनी ईश्वराचं सहाय्य आहेच आहे, होतंच आहे. तीन दिवसांपर्यंत या ठिकाणी एक मोठा याग झाला. दिगंबरा मंत्राचा जपही झाला. त्याचं हवनही झालेलं आहे. हेही दुरित क्षयाला उपकारक अशा प्रकारचं आहे.

ईश्वर आहे असे म्हणणारेही लोक आहेत. नाही म्हणणारेही लोक आहेत. वेदामध्ये आणखी मूर्तीचं प्रतिपादनही केलेलं आहे. आज या ठिकाणी आणखी तीन दिवस पर्यंत दत्तात्रेयांची पूजा झाली मूर्ती स्थापन करून. प्रतिमापूजा आणखी हवन झालेलं आहे. अग्नीला ईश्वराचे मुख म्हटलेले आहे. अग्नीच्या द्वारानी, माध्यमातून ईश्वरापर्यंत ते पोहोचलेलं आहे. तर अशा रीतीनं आणि त्याचंच प्रतीक म्हणून ही सगळी मंडळी प्रत्यक्ष आपल्याला पहायला मिळाली. ठाण्यामध्येसुद्धा लोकांना माहीती नाही असं आता कोणीतरी

सांगितलं तर बाहेरच्या आमच्यासारख्या पुण्याच्या लोकांना कसं माहीती असणार. खरे कार्यकर्ते जे आहेत त्या कार्यकर्त्यांचं कर्तव्यबुद्धीनं ईश्वरप्रेरणेनं हे कार्य चाललेलं आहे. सर्वांतर्यामी, सर्वांच्या बुद्धीला प्रेरणा करणारी एक शक्ती आहे ही जाणीव बुद्धीला झाली पाहिजे. ईश्वराचे गुण सांगताना ज्ञानराजांच्या वाणीत कवित्व आहे, रसिकत्व आहे. शेवटी परतत्त्वस्पर्श त्या वाणीला झालेला आहे. ती वाणी पवित्र आहे. आणि ते मन, बुद्धी त्याला उपयुक्त अशा प्रकारची बुद्धी हे पवित्र आहे. सर्व लोकांना मार्गदर्शक ठरणारी आहे असं सांगितलेलं आहे. आता हे एक शेवटचं फक्त ही भगवद्भक्ती दुरितक्षय होऊन आणखी भगवद्भक्ती आपल्या चित्तामध्ये उत्पन्न व्हावी त्या दृष्टीनं आणखी अशा प्रकारची पुण्यकर्महीं ठिकठिकाणी चालू आहेत भारतामध्ये. पहिल्यापासून चालू आहेत. मोठे मोठे संत महात्मे, आचार्य महाराज, ज्ञानेश्वर महाराज, एकनाथ महाराज सर्वांनी आणखी हे करायला सांगितलं आहे.

एका भक्ताची प्रार्थना फक्त आपल्याला सांगायची, तीन दिवस याग झाला. तीन दिवस आपण सगळी मंडळी आलात. त्याचप्रमाणे याच्याही पूर्वीपासून प्रयत्न करणारी आणखी सेवा करणारी मंडळीही पुष्कळ आहेत हे झालं कार्य. परंतु 'सत्कर्म योगे वय घालवावे' असं समर्थांनी सांगितलेलं आहे. त्याप्रमाणे आपल्या आयुष्यात नित्य काहीतरी हातून, आपल्या इंद्रियांनी, देहानी, मनानी, वाणीनं, बुद्धीनं काही तरी ईश्वरसेवा, भक्ती झाली पाहिजे. एका भक्ताची तेवढी प्रार्थना

आहे तेवढी आपल्याला सांगून मी माझं भाषण संपविणार आहे.

**कलावारास्याम् ............. निमिषमेवनिश्यामेकथाम् ॥**

*******

वाराणसी तीरावर मला रहायला मिळालं पाहिजे. घर नको, बंगला नको, काही नाही. आणि त्या ठिकाणी केवळ कौपीन धारण करणं म्हणजे वैराग्यपूर्ण आहे. आणखी भगवद्प्रेमही अंत:करणामध्ये पूर्ण आहे. आपलं नामस्मरण अखंड माझ्या मुखातून चालावं. प्रसन्न व्हा, माझ्यावर आपली कृपा करा. ***अनेक वर्ष सेवा, भक्ती झाली तरी एक निमिषच सेवा झाली असं वाटलं पाहिजे. म्हणजे इतका कर्तृत्वाभिमान दूर झाला पाहिजे. कालमर्यादाही नको आहे. कालमर्यादाही विसरुन जायला पाहिजे. केवळ कालमर्यादेचं स्मरण करुन किंवा कालाचं स्मरण करुन काय करायचंय? तर अशा दृष्टीनं ईश्वराजवळ प्रार्थना हीच करायची आहे की किती दिवस मी सेवा भक्ती केली हे लक्षात राहू नये. माझ्या हातून गुरुभक्ती, सत्कर्म श्रद्धेनं किती दिवस झाली हे विसरुन गेलं पाहिजे. हे त्या भक्तांनी देवाजवळ मागितलेलं आहे.. अशी आमच्या मनाची स्थिरता त्या भक्तीमध्ये आणि भगवंताच्या सेवेमध्ये राहिली पाहिजे म्हणजे आपण आणखी कृतार्थ होऊ शकतो. ही प्रार्थना सफल होण्याकरिता म्हणून सर्वांतर्यामी परमेश्वर आहे.*** सर्व ठिकाणी आहे. आत्मस्वरूप सर्वत्र एक आहे

आचार्य महाराज सांगतात. परंतु आचार्य महाराज हे केवळ एक वैयक्तिक कार्य करण्याकरिता आलेले नव्हते. त्यांना समाजाची व्यवस्था करायची होती. बौद्ध मताचा पराजय करण्याचं कारण काय आहे. बुद्धीभेद करणारे अशा प्रकारचे जे युक्तिवाद आहेत ते युक्तिवाद कसे सदोष आहेत हे दाखवून समाजामध्ये असणारी सर्वांची बुद्धी विषम आहे हे सिद्ध केले. बुद्धीची समता कोणाचीही, साम्यवाद आपण करू शकत नाही आहे. बाकीची समता झाली पाहिजे म्हणतात तेही अजून मान्य होत नाही, झालं नाही, होणार नाही. परंतु बुद्धीची विषमता ही केव्हांही दूर होणार नाही आहे.

तर ती बुद्धीची योग्यता उत्पन्न होण्याकरीता पंचोपचार पूजा त्यांनी सांगितली त्याप्रमाणे सर्वही देवतेमध्ये परमात्मा ही एक भावना एकात्म भावना धारण करुन सर्व देवतांच्याही स्तुती केल्या आहेत. भगवतीचं सौंदर्य लहरी स्तोत्र तर किती विलक्षण त्यांनी केलेलं आहे. वाचन करत असताना आणखी सर्व आपल्याला पहाता येतं. आणि शेवटी त्यांनी असंच केलंय. चरित्र हे लिहिलं, स्तोत्र केलं आचार्य महाराजांनी, परंतु तुझीच वाणी आहे, तुझ्यापरीनं तूही स्तुती केली मी काय केलेलं आहे. ही अशा प्रकारची आणखी निरहंकार बुद्धी उत्पन्न व्हावी हे देवाजवळ मागायचंय तर दुरिताचं तिमिर गेल्याप्रमाणे होईल. स्वधर्माबद्दल श्रद्धा, भक्ती निर्माण होईल आणि नंतर राज्यशासनानं लक्ष दिलं किंवा दिलं नाही तरीसुद्धा 'जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात ।' एका प्राण्याला नाही, सगळ्यांना मिळू

शकेल. हा त्यांचा आत्मविश्वास हा त्यावेळेला प्रगट होईल. आपण सर्व मंडळींनी या ठिकाणी अत्यंत श्रद्धा भक्तीनं तीन दिवसांपर्यंत हा कार्यक्रम ईश्वरभजनामध्ये राहून केला. श्रद्धा, भक्ती व्यक्त केली याचं समाधान मुख्य संचालक गुरुभक्त भगवंतरावजी यांच्या मनामध्ये झालेलं आहे. त्यांनीही आपलं हृदगत आरंभाला बोलून दाखिवलेलं आहे.

समर्थांनी प्रार्थना केली शेवटी, त्यांनी आपलं समाधान व्यक्त केलं. 'तुझा तू वाढवी राजा' हे सांगून मोकळे झाले. माझा काही संबंध नाही म्हणाले. त्या राजाला तूच वाढवलं आहेस. तर शेवटी एक त्यांना समाधान झालं 'उदंड झाले पाणी स्नानसंध्या करावया' वगैरे वगैरे त्यांचं हे काव्य आहे. एक समाधान त्यांना वाटलं काही तरी थोडसं लोकांमध्ये बुद्धी आणखी थोडीशी बदलायला लागलेली आहे. त्यांना दुसरं काही नको असतं. लोकांची बुद्धी शुद्ध व्हावी आणि लोकांचं कल्याण व्हावं इकडे त्यांचं लक्ष आहे. ईश्वराचे अवतारही याच्याचकरीता होतात. ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे संत महात्मेसुद्धा हेच कार्य करीत असतात. असंच कार्य आणखी या ठिकाणी चालू आहे. कर्मयोग आणि भक्तियोग, दोन्ही पाहिजे. केवळ कर्मयोग उपयोग नाही आणि केवळ भक्तियोगही उपयोग नाही. दोन्हींचा समन्वय शास्त्रसंमत आहे. तेव्हां धर्म आणि भक्ती हे दोन्ही मिळून कार्य भारतामध्ये ठिकठिकाणी चालू राहिली पाहिजेत. संतमहात्म्यांनी हे चालू करून दिलेलं आहे. ७०० वर्षे ज्ञानराजांनी

जो हे लावलेलं आहे, वारीचा पायंडा पाडलेला आहे. वारीला प्रत्येकांनी जायला पाहिजे पंढरपूरला, ७०० वर्षे होऊन गेली अखंड चालू आहे. राष्ट्रपतीचा वटहुकूम निघाला तरी हे चालणार नाही हे लक्षात घेण्यासारखं आहे. फार तर २-३ दिवस. ७०० वर्षे कोण जाणार वारीला? तर ही बुद्धीची एकता जी आहे ती एकता पूर्ण त्या बुद्धीला मिळालेली आहे. तशा महात्म्यांच्या द्वारांनी हे होऊ शकतं कार्य. तेव्हां असं हे कार्य ठिकठिकाणी व्हावं, असं कार्य करुन ईश्वर प्रसारही संपादन करावा आणि ईश्वर प्रसादाने आणखी सर्वांचं पूर्ण कल्याण व्हावं ही सर्वांतर्यामी भगवान दत्तात्रेयांच्याजवळ प्रार्थना आहे.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

